२९

श्रीमती अंजली अ. अंबेकर यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गात देण्यात आलेली तदर्थ/तात्पुरती पदोन्नती नियमित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश :- संलेको-२०२०/प्र.क्र.१५६/कोषा प्रशा-२
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक ०३.११.२०२२.

संदर्भ:- १)शासन आदेश :-संलेको-२०१८/प्र.क्र.१५६/कोषा प्रशा-२,दि. २४.११.२०२१

**:शासन आदेश:**

संदर्भाधिन शासन आदेशान्वये सन २००२-०३ ते सन २०१७-१८ या कालावधीत महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखाधिकारी संवर्गातून गट-अ (कनिष्ठ) सहाय्यक संचालक संवर्गात देण्यात आलेल्या तदर्थ/तात्पुरत्या पदोन्नत्या रांदर्भाधिन शासन आदेश दि.२४.११.२०२१ अन्वये नियमित करण्यात आल्या आहेत.

२. श्रीमती अंजली अ. अंबेकर यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखाधिकारी संवर्गातून गट-अ (कनिष्ठ) सहाय्यक संचालक संवर्गात देण्यात आलेली तदर्थ/तात्पुरती पदोन्नती खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार नियमित करण्यात येत आहेत. सदर तदर्थ/तात्पुरती पदोन्नती अधिकाऱ्यांना, उपलब्ध रिक्त पदांच्या दिनांकानुसार त्यांच्या नावासमोर रकाना क्र.७ मध्ये नमूद केलेला दिनांक हा त्यांच्या पदोन्नतीचा नियमित दिनांक म्हणून खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**सन २०२०-२१ करिता सुधारित नियमित निवडसूची**

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | निम्न संवर्गातील ज्ये.क्र/वर्ष | जात प्रवर्ग | पदोन्नती साठी विचारात घेतलेला प्रवर्ग | तदर्थ पदोन्नतीच्या पदावरील रुजु दिनांक | नियमित दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | श्रीम.अंजली अ. अंबेकर | १०३/२०२० | खुला | खुला १ | ०३/०६/२०१३ | १५/०६/२०१९ | परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकानुसार नियमित |

१) ज्या अधिकाऱ्यांना दि.१३/०९/२०१२ नंतर म्हणजेच सुधारित सेवा प्रवेश नियम अंमलात आल्यानंतर तदर्थ/तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीत पदोन्नतीसाठी पूर्वअर्हता नमूद केलेली पूवअर्हता परीक्षा उत्तीर्ण/सूट मिळाल्याच्या दिनांकानुसार निवडसूचीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

२) उपरोक्त नमूद नियमित निवडसूचीत समावेश केलेल्या अधिकाऱ्यांची सहाय्यक संचालक संवर्गातील ज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली- २०२१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावी.

०५५/२०२२/८५

३) उपरोक्त अधिकाऱ्यांची तदर्थ/तात्पुरती पदोन्नती, पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहून नियमित करण्यात येत आहे.

४) उपरोक्त अधिकाऱ्यांची तदर्थ/तात्पुरती पदोन्नती सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८६४/२०२१ दि.२१/१०/२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून नियमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.*
अप्पर मुख्य सचिव (लेखा व कोषागारे), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
संबंधित अधिकारी.*
निवड नस्ती कोषा.प्रशा.१ व २, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई)